# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२—२२३१०४ **E-Mail** : registrar.gondwanauniversity@gmail.com

जा.क्र./गोंवीग/कु.कार्या./ 803 /२०१७ दिनांक ०४/०२/२०१७

प्रति,

मा. प्राचार्य
सर्व संलग्नीत महाविद्यालय,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय :— विद्यापीठाच्या चतुर्थ दीक्षांत समारंभाला उपस्थित राहण्याबाबत प्राध्यापकांना व प्रशासकीय अधिका—यांना सुचना निर्गमीत करण्याबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे सोमवार, दिनांक १३/०२/२०१७ ला सकाळी ११.०० वाजता विद्यापीठ परिसरात चतुर्थ दीक्षांत समारंभ संपन्न होत आहे. या दीक्षांत समारंभाला पद्म भुषण डॉ. विजय भटकर (परम् संगणकाचे जनक) कुलपती, नालंदा विद्यापीठ, नालंदा हे प्रमुख अतिथी म्हणून दीक्षांत भाषण करणार आहेत व श्री. रणजीत मुशाहरी, माजी राज्यपाल, मेघालय हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. नामदेव व्ही. कल्याणकर दीक्षांत समारंभाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित राहतील.

या अतिशय महत्वाच्या कार्याक्रमाला गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रातील गणमान्य अतिथी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व पदवी प्राप्त विद्यार्थी फार मोठया संख्येने उपस्थित राहण्याची विद्यापीठ प्रशासनाला अपेक्षा आहे.

तरी आपणांस मा. कुलगुरू यांच्या आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाच्या संस्थेचे मा. अध्यक्ष/सचिव यांना व महाविद्यालयाला विद्यापीठाने निमंत्रण पत्रिका यापुर्वीच पाठविलेल्या आहेत. ती कदाचीत मिळाली नसल्यास कृपया विद्यापीठाचे हे निमंत्रण त्यांना अवगत करून दयावे व कार्यक्रमाला उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात यावे. तसेच आपण स्वत: व आपल्या महाविद्यालयातील विद्यापीठाच्या विविध प्राधीकरणाचे अध्यक्ष/सदस्य, उर्वरीत सर्व प्राध्यापक आणि प्रशासकीय अधिकारी यांना या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याबाबत सुचना देण्यात यावी व कार्यक्रमाला आर्वजुन उपस्थित राहावे, ही विनंती.

धन्यवाद !

आपला विश्वासू

(दीपक जुनघरे)
कुलसचिव (का.)
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली